**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | Subject |
|---|---|---|---|---|
| Punya Nagari | Mumbai | 03/12/2017 | 03 | Mintage World |

# एक रुपयाची नोट प्रदर्शनाचा आज अखेरचा दिवस

**मुंबई** : एक रुपयाच्या नोटेच्या १०० वर्षांच्या विस्मयकारक प्रवासाला सलाम करण्यासाठी मुंबईत वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड येथे तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून रविवार, ३ डिसेंबर हा अखेरचा दिवस आहे. सामान्य जनता, नोटा-नाण्यांचा छंद असलेले लोक, विद्यार्थी, विद्वान, संग्राहक, व्यापारी, खरेदीदार, विक्रेते आणि गुंतवणूकदारांना चलनाविषयी माहिती करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी www.mintageworld.com हे ऑनलाइन म्युझियम लाँच केले. या काळात प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांना हे खास मेमेण्टो दिले जात आहेत. १९१७ साली जारी झालेली ही नोट दिसते कशी हे तर लोकांना बघायला मिळावे, तसेच एका वैभवशाली इतिहासाचा भाग म्हणून ती घरी घेऊन जाण्याची संधीही मिळावी या हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

३०/११/२०१७ रोजी जारी झालेली पहिली एक रुपयाची नोट ही 'आय प्रॉमिस टू पे' अशा अर्थाचा मजकूर छापलेली एकमेव प्रॉमिसरी नोट होती. त्यानंतर भारत सरकारने आत्तापर्यंत जारी केलेल्या कोणत्याही एक रुपया मूल्याच्या नोटेवर हा मजकूर नाही. १९१७ ते २०१७ या काळात एक रुपये मूल्याच्या १२५ वेगवेगळ्या नोटा जारी झाल्या. यात २८ वेगवेगळी डिझाइन्स, अनुक्रमांक आणि स्वाक्षऱ्या असलेल्या नोटांचा



समावेश आहे. आरबीआय गव्हर्नरांची नव्हे, तर अर्थ सचिवांची स्वाक्षरी असलेली ही एकमेव भारतीय नोट आहे. भारतीय चलनातील या नोटेवर 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' असे छापलेले आहे. अन्य नोटांप्रमाणे 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' नव्हे. आधुनिक जगाला आपला समृद्ध जागतिक ऐतिहासिक वारसा, परंपरा व संस्कृतीबद्दल शिक्षित करण्यासाठी हे म्युझियम प्रभावी व्यासपीठ होऊन काम करत आहे. जगभरातील स्टॅम्प्स (शिक्के), नाणी आणि चलनी नोटांची दुर्मिळ माहिती हे म्युझियम उत्तम कॅटलॉग्जच्या माध्यमातून एकाच ठिकाणी देते. या म्युझियमचे तीन विभाग आहेत : नाणी- नाणी व पदकांचे अभ्यास करणारे शास्त्र अर्थात न्युमिसमॅटिक्स, चलनी नोटा- नोटाफिली आणि स्टॅम्प्स (शिक्के)- फिलॅटली. यातील उपविभागही काटेकोरपणे निश्चित करण्यात आले असून नेव्हिगेशन अत्यंत सुलभ व विनाअडथळे करता येते. या ऑनलाइन म्युझियमवर अपलोड झालेल्या प्रत्येक नाण्याचा मिंटमार्क, नोंदणीचे तपशील, वजन, धातू, मूल्य, सत्ताधारी सम्राट, राजवट, तारखा काळजीपूर्वक देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे स्टॅम्प्ससोबतही जारी झाले ती तारीख, प्रकार, छिद्रे पाडण्याची पद्धत, मूल्य देण्यात आले आहे. नोटांसोबतही स्वाक्षरीचे तपशील, मोटिफचे (चित्र) वर्णन, मूल्य, जारी झाल्याची तारीख, नोटेचा प्रकार ही माहिती देण्यात आली आहे.

**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | Subject |
|---|---|---|---|---|
| Punya Nagari | Mumbai | 02/12/2017 | 01 | Mintage World |

## मिंटेजवर्ल्डचे प्रदर्शन

**मुंबई** : एक रुपयाच्या नोटेला नुकतीच शंभरी पूर्ण झाली. १९१७ ते २०१७ या काळात एक रुपये मूल्याच्या १२५ वेगवेगळ्या नोटा जारी झाल्या. यात २८ वेगवेगळी डिझाईन्स, अनुक्रमांक आणि स्वाक्षऱ्या



असलेल्या नोटांचा समावेश आहे. आरबीआय गव्हर्नरांची नव्हे, तर अर्थसचिवांची स्वाक्षरी असलेली ही एकमेव भारतीय नोट आहे. या नोटेच्या १०० वर्षांच्या विस्मयकारक प्रवासाला सलाम करण्यासाठी मिंटेजवर्ल्डच्या वतीने आयएनपीईएक्स-२०१७ नॅशनल फिलॅटलिक खास प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. कफ परेड येथील वर्ल्ड ट्रेंड सेंटरमध्ये ३ डिसेंबर २०१७ पर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांना खास मेमेण्टो दिले जात आहे. १९१७ साली जारी झालेली ही नोट दिसते कशी हे तर लोकांना बघायला मिळावेच, शिवाय एका वैभवशाली इतिहासाचा भाग म्हणून ती घरी घेऊन जाण्याची संधीही मिळावी, या हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.